


# इलेक्शनचा नाद खुळा

# महायुतीत चेकमेट अन् शह-कटशहच्या राजकारणाला ऊत






## जंक्शनवर शरद पवार आणि शिंदे सेनेचं तुझ्या माझ्या गळा गुंफू नगरपरिषदेमधील सत्तेच्या माळा!

## अगा नवलंच घडलं कुर्डुवाडीत तुतारी अन् धनुष्यबाण आखाड्यात एकत्र

- डिकोळेंच्या २५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी शिंदे सेना अन् शरद पवार राष्ट्रवादीचे सूरात सूर
- निवडणूक वेगळ्या धक्कादायक वळणावर राजकीय जाणकारांसह सगळ्यांचेच अंदाज फोल



### डिकोळे गट स्वतंत्रपणे लढण्याच्या तयारीत?

एकीकडे शिंदेची शिवसेना आणि पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्याने कुर्डुवाडी शहरात राजकीय चर्चांना उधाण आली आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी रिपब्लिकन पक्षाचे आठवले गटासोबत युती केली आहे. डिकोळे हे स्वतंत्रपणे लढण्याच्या तयारीत आहेत. भाजपही शांत दिसत आहे.

**सोलापूर : नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने, राज्यासह सोलापूर जिल्ह्यात जोरदार घडामोडी घडत आहेत. पक्षप्रवेश आणि शह-कटशहाच्या राजकारणाला ऊत आला आहे. राजकीय पक्षांकडून विशेषतः महायुतीमधील पक्ष एकमेकांना चेकमेट करण्यात गुंतल्याचे दिसून येते. त्यातून काही ठिकाणी विरोधकांशी हातमिळवणी केली जात आहे. सोलापूर जिल्ह्यात कुर्डुवाडी नगरपरिषदेसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.**

### राष्ट्रवादी काँग्रेससह आघाडीमधील काँग्रेस ठाकरे शिवसेना गटाचं काय?

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युतीला खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार नारायण पाटील, तर शिवसेनेचे माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांना हिरवा कंदिल दाखवला आहे. या नेतेमंडळींमधील चर्चेनंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. यावर महायुतीमधील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची, तर महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना उबाठा पक्षाची काय प्रतिक्रिया येते, हे पाहावे लागणार आहे.

## धुमशान

विशेषत्वे, धनंजय डिकोळेंच्या २५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी शिंदे सेना अन् शरद पवार राष्ट्रवादीचे सूरात सूर मिसळले आहेत. त्यातून इथली निवडणूक वेगळ्या धक्कादायक वळणावर गेली आहे. इथल्या निवडणुकिविषयी राजकीय जाणकारांसह सगळ्यांचेच अंदाज फोल ठरल्याची वस्तुस्थिती असल्याचं सांगण्यात आलं

कुर्डूवाडी नगरपरिषदेवर शिवसेना पूर्वीची शिवसेना आणि आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते धनंजय डिकोळे यांची गेली वीस ते पंचवीस वर्षांपासून सत्ता आहे. धनंजय डिकोळे यांची कुर्डूवाडी शहरात मोठी ताकद आहे. डिकोळे यांच्या गडाला शह देण्यासाठी शिंदेंची शिवसेना आणि पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

कुर्डूवाडीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची युती करण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी करमाळ्याचे आमदार नारायण पाटील, माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांच्याशी युतीबाबत चर्चा केली. त्यानंतर आमदार नारायण पाटील आणि शिवसेनेचे माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांनी होकार दर्शविली. त्यामुळे सोलापुरात तुतारी आणि धनुष्यबानाची युती झाली आहे.

या वेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, शिवसेना जिल्हा उपप्रमुख तात्यासाहेब गोडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख आनंद टोणपे, शिवसेना शहर प्रमुख संभाजी सातव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष दत्ताजी गवळी, माजी नगरसेवक लतीफ भाई मुलाणी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या किसान सेल जिल्हाध्यक्ष शंकर बागल यांच्यामध्ये सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर निवडणुकीत एकत्रितपणे सामोरे जाण्याचा निर्णय जाहीर केला.



## पंढरीत आघाडीचा गोंधळात गोंधळ पत्र्यात धिंगाणा अन् चावडीत कीर्तन




- टस्सल, टेन्शनआधीच अफवेचं मायंदाळ पीक की खरोखर फाटाफुटी?
- महाआघाडीच्या नेटवर्कमधून बडे नेते गायब झाल्यानं चर्चांना उधाण
- राज्यस्तरावरुन निवडणुकीमधील नव्या समीकरणांसाठी पडद्याआडून रणनितीच्या खेळ्या खेळल्या जात असल्याचा तर्क

सोलापूर : मुख्यत्वे, नगराध्यक्षपदासह एकूणच नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या धर्तीवर, पंढरपुरात गोंधळात गोंधळ निर्माण झाला आहे. नगरपरिषदच्या निवडणुकीतील टस्सल अन् टेन्शनआधीच इथं आघाडीमधील नेते फुटल्याच्या अफवांचं मायंदाळ पीक आलं आहे. खरोखरच नेतेमंडळी फुटली का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विठ्ठल परिवार पर्यायाने सर्वपक्षीय महाआघाडी करण्यात योगदान राहात असलेल्या मनसेच्या दिलीप धोत्रे यांच्याकडून महाआघाडी अबाधित आहे, असा खुलासा करण्यात येत असला तरी लोकांमध्ये संभ्रम कायम असतानाचं चित्र आहे.

विशेष करुन पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी महाआघाडीच्या जन्मानंतर नवीन समीकरण जुळवण्यासाठी सत्ताधारी भाजपकडून राज्यस्तरावरुन पडद्याआडून जोरदार खेळ्या सुरु असल्याच्या चर्चांना विठ्ठ नगरीत अक्षरशः उधाण आलं आहे. त्यातूनच वातावरण अधिक ढवळलं जात आहे.

नगरपरिषदेसाठी तयार झालेली महाआघाडी अबाधित आहे. आघाडीमधील कोणीच फुटलेलं नाही, महाआघाडी झाल्याबद्दल न बघविणाऱ्या असंतुष्टांकडून आघाडीत बिघाडी झाल्याच्या अफवा मुद्दामहून पसरवल्या जात असल्याचा खुलास दिलीप धोत्रे यांनी केली आहे.

> “ पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी आघाडी करण्याचा निर्धार आहे. या संदर्भात श्री विठ्ठल कारखाना स्थळावर बैठकदेखील झाली आहे. मात्र काही बाबी स्पष्ट व्हायला हव्यात. नगराध्यक्ष, उमेदवारी संदर्भात कोणी कोणाला शब्द दिला आहे का? शिवाय आणखी काय ठरले आहेत का? त्याशिवाय पक्षाच्या वरिष्ठांसह शहरातील जुन्या, जाणकार, प्रभावी व्यक्तीमत्वांशी चर्चा करण्याचा मुद्दा आहे. आघाडी संदर्भात वरिष्ठांशी मी चर्चा केली आहे. आता शहरातील संबंधितांशी बोलणी करुन आघाडी फायनल करण्याला गती देण्यात येईल. दोन दिवस मुंबईत महत्त्वाच्या कामांनिमित्त होतो. मतदार संघातील अतिवृष्टीग्रस्त साधारण ५० हजार शेतकरी फार्मर आयडीअभावी वंचित आहेत. फार्मर आयडीची अट रद्द करण्यासाठी मुख्यमंत्री यांची भेट घेऊन तो निर्णय रद्द करायला लावला. त्यासाठी मुंबई होतो. आज गुरुवारी आघाडी होण्याची प्रक्रिया पुढे सरकण्याचे प्रयत्न होतील.
> – **अभिजित पाटील,** आमदार, पंढरपूर– माढा

### आमदार अभिजित पाटील अन् अनिल सावंताचं चाललंय काय?

भाजप पुरस्कृत परिचारक गटाला पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीत चारीमुंड्या चित करुन नगरपरिषदेवर महाआघाडीचा झेंडा रोवण्यासाठी विस्कटलेल्या विठ्ठल परिवाराला एकसुत्रात बांधून महाआघाडीला जन्म घालण्यात पहिल्यापासून योगदान दिलेले आमदार अभिजित पाटील हे आघाडीपासून मागच्या तीन दिवसांपासून दुरावल्याची जोरदार चर्चा आहे. कोणत्याही बैठकांना त्यांची उपस्थिती नाही. तोच प्रकार शरचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल सावंत यांच्याबाबतीतदेखील झाला आहे.आघाडीच्या नेटवर्कमधून ते बाहेर गेलेत. ते शरद पवार राष्ट्रवादी पक्षाकडून इच्छुक असलेल्यांच्या मुलाखती घेत आहेत. त्यामुळे या दोघांची भूमिका काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### पालकमंत्री गोरेंची खलबतं, पाटलांचा नूर बदल्याचीसुद्धा चर्चा

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी मुंबई पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार अभिजित पाटील यांच्यामध्ये खलबतं झाली. त्यानंतरच पाटील यांचा नूर बदलला याचीदेखील पुढी सोडण्यात आली आहे. त्यातून चर्चेला उधाण आलं आहे. आहे. अनिल सावंत यांची काय खेळी झाले हे मात्र अद्याप अस्पष्ट आहे.

## चेतनभाऊ म्हणाले, काँग्रेसला येणार भरती; नाराज भाजपवाले घेणार ‘हातात हात’




**सोलापूर** : सोलापूर महापालिकेच्या निवडणूक आरक्षण सोडतीनंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी माध्यमांशी संवाद साधला. निघालेलं आरक्षण काँग्रेस किंबहुना महाविकास आघाडीसाठी अनकुल आले, आमचे लोक खुश आहेत असं सांगताना त्यांनी भाजपबद्दल गौप्यस्फोट केला. या पक्षातील जुने जाणते ८० हून अधिकजण नाराज आहेत.ते काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत, त्यातून या पक्षाला भरती येणार आहे, असे ते म्हणाले. एकीकडं भाजपला भरती येतानाच दुसरीकडे भाजपला शहरात ओहोटी येणार आहे, हे नरोटे यांनी केलेलं विधान आश्चर्यकारक मानलं जातंय.शहराध्यक्ष नरोटे यांनी भाजपात मोठमोठ्या हालचाली होत आहेत. उमेदवार पळवापळवी, पक्ष कार्यालयात जाऊन राजीनामे देणे अशा अनेक बाराभानगडी होत आहेत, असे त्यांनी नमूद करत भाजपमधील घडामोडींचा पंचनामा केला. मात्र काँग्रेसला खरोखर भरती येणार, भाजपला सोलापुरात आहोटी लागणार का? याचे उत्तर काळाकडे असेल. तोपर्यंत नरोटे यांचं विधान सच क्या झूठ क्या? यामध्येच असणार आहे.



### झिंग झिंगाट

सुरु आहे बाई
इलेक्शन,
वातावरण होतय्
**तप्त,**
माझ्या रावांनी
भरलाय फॉर्म,
डिपॉझिट होणार
तर नाही ना
**जप्त?**

- पक्षप्रवेशाचं लवकरच धूमधडाक्यात होणार बारसं
- काँग्रेसमध्ये दुखावलेल्या ‘सिंहा’ला करायचं आहे मनसोक्त नेतृत्व
- माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात मोठा राजकीय ट्विस्ट आला समोर,

# अकलूजचा ‘सिंह’ दादा गटाच्या राष्ट्रवादीत!

## अस्वस्थ नेतृत्वाला सत्तेची ‘पॉवर’बाज ‘पवार ऊर्जा !’



मैं निकला अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस के संग...संग..!



### उमेशदादा दाखवाताहेत करुन; धवलसिंहांना नव्या नेतृत्वाची संधी

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी धवलसिंह मोहिते पाटील यांना राष्ट्रवादी अजित पवार गटात आणण्यात यश मिळवले आहे, असं मानलं जातयं. एकीकडे अकलूज नगरपंचायतीची निवडणूक जाहीर झालेली आहे. त्यामुळे अकलूज नगरपंचायतीत राष्ट्रवादी अजित पवार गटाला बडा नेता मिळत असल्याची चर्चा आहे. धवलसिंह मोहिते पाटील यांनी जर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला तर त्यांच्यासमोर अकलूज नगरपरिषदेचं मोठं आव्हान असणार आहे. त्यामुळे धवलसिंह यांच्यासाठी आपले नेतृत्व सिद्ध करण्यासाठी आणखी एक संधी निर्माण झाली आहे.

### ‘कमळ’ नाही हातावर ‘घड्याळ’

मागील अनेक दिवसांपासून डॉ. धवलसिंह हे भाजपच्या संपर्कात होते मात्र अखेर त्यांचा भाजप प्रवेश झाला नाही. मात्र त्यानंतर आता त्यांनी अजित पवार राष्ट्रवादी गटात प्रवेश करण्याचं ठरवलं आहे. काँग्रेस पक्षाला हात दाखवून पक्षांतराचा प्रयत्न करत असलेल्या धवलसिंहाच्या हातात ‘कमळ ’नाही आलं. पण मनगटावर ‘घड्याळ’ येणार आहे हे निश्चित मानलं जातंय.

पुणे: जनहित संघटनेचे सर्वेसर्वा आणि सोलापूर जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील हे अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृतरित्या प्रवेश करणार असून त्यांच्या पक्षांतराच्या पार्श्वभूमीवर, पुण्यात उपमुख्यमंत्री तथा या पक्षाचे प्रमुख अजित पवार यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाल्याची अत्यंत खात्रीलायक माहिती ‘सुराज्य’ मिळाली आहे. पुढच्या काही दिवसांत पक्ष प्रवेशाचं बारसं जोरात करण्यात येणार असल्याचीदेखील माहिती आहे. डॉ. धवलसिंहांच्या अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवेशानं माळशिरस तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील काही राजकीय समीकरण बदलू शकतात. त्यांच्या प्रवेशाच्या अनुषंगाने, मोठा राजकीय ट्विस्ट समोर आला आहे.

विशेषत्वे, डॉ. मोहिते-पाटील यांच्या काही प्रश्नांसदर्भात त्याशिवाय महत्त्वाचे म्हणजे पक्ष प्रवेशाबाबत अजित पवार यांची त्यांनी पुण्यात भेट घेतली. यावेळी सविस्तर चर्चा झाली. डॉ. धवलसिंहासोबत त्यांच्या मातोश्री पद्मजादेवी यादेखील उपस्थित होत्या असं सांगण्यात आलं.

डॉ.धवलसिंह हे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष होते त्यावेळी त्यांना पक्षीय गटबाजीतून काम करण्याला सतत खो घालण्यात आला. त्यामुळं या पदावर त्यांना प्रभावी काम करता आलं नाही. तेव्हापासून आणि जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतरदेखील डॉ. धवलसिंह हे राजकीयदृष्ट्या अस्वस्थ आहेत. त्यांच्या अस्वस्थ नेतृत्वाला सत्तेची ‘पॉवर’बाज ‘पवार ऊर्जा !’ अजित पवार गटात प्रवेश केल्यानंतर मिळणार असल्याचं मानलं जातं. त्यासाठीच त्यांनी पक्ष प्रवेशाचा निर्णय घेतल्याचीदेखील माहिती निकटवर्तीयांकडून देण्यात आली. जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने आणखी एका नेत्याला पक्षात आणण्याचा प्रयत्न केलाय.